मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543



रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
9890879757

वर्ष ७वे | अंक :१९ | रविवार दि.१० ऑगस्ट ते शनिवार १६ ऑगस्ट २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ — संपादकीय — धन्य आहे निवडणूक आयोग, धन्य आहे लोकशाही!..
पान ३ — भूमाफियाचा डोंगरावर डाका...
पान ४ — प्रलंबित वनहक्क दावे निकाली;...

## वसई-विरार महापालिकेच्या माजी आयुक्तांच्या घरी ईडीची १८ तासांची धडक कारवाई; बेकायदेशीर इमारत घोटाळ्याची मोठी फाईल

वसई (प्रतिनिधी):वसई-विरार शहर महानगरपालिकेचे (VVMC) माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या शासकीय बंगल्यावर सक्तवसुली संचालनालयाने (ED) मंगळवारी (२९ जुलै) सकाळी ७:३० वाजता घातलेली धडक कारवाई तब्बल १८ तास चालून मध्यरात्री १:३० वाजता संपली. या काळात अधिकाऱ्यांनी घरातील कागदपत्रे, हार्ड डिस्क, डिजिटल डिव्हाईसेस आणि इतर महत्त्वाचा डेटा जप्त केला. मात्र, कुणालाही ताब्यात घेण्यात आले नाही.सूत्रांनुसार, ही छापेमारी डम्पिंग ग्राउंडवरील आरक्षित जमिनीवर झालेल्या ४१ बेकायदेशीर इमारतींच्या बांधकाम प्रकरणाशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार तपासाचा भाग होती. ईडी अधिकाऱ्यांनी माध्यमांशी कोणतीही औपचारिक प्रतिक्रिया न देता जागा सोडली.

छाप्याच्या पार्श्वभूमीला मोठा घोटाळा२००९ पासून वसई-विरार परिसरात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर निवासी व व्यावसायिक इमारती उभारल्या गेल्याचे उघड झाले आहे. नालासोपारा पूर्वेकडील अधिकृत विकास आराखड्यात मलनिस्सारण प्रकल्प व कचरा डेपो यासाठी आरक्षित जमिनीवर बेकायदेशीर पद्धतीने मंजुरीपत्र तयार करून इमारती बांधल्या गेल्या आणि विकल्या गेल्या.

या फसवणुकीतून हजारो नागरिकांची मोठी आर्थिक फसवणूक झाली.८ जुलै २०२४ रोजी बॉम्बे उच्च न्यायालयाने सर्व ४१ इमारती पाडण्याचा आदेश दिला. सर्वोच्च न्यायालयानेही रहिवाशांची याचिका फेटाळल्यानंतर, २० फेब्रुवारी २०२५ रोजी न्न्षण ने ही कारवाई पूर्ण केली.छाप्याचा टायमिंग आणि ठिकाणेअनिलकुमार पवार यांची बदली झाल्यानंतर अवघ्या २४ तासांत ईडीने ही कारवाई सुरू केली. २८ जुलैला त्यांच्या निरोप समारंभानंतर पवार यांनी महत्त्वाची कागदपत्रे घरी आणल्याची माहिती मिळताच, दुसऱ्याच दिवशी सकाळी ईडीने ठोसा दिला.

पान नं.२वर




## प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या जप्त – वसई विरार महापालिकेची मध्यरात्री कारवाई...



वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘जी’ अंतर्गत वालीव कार्यक्षेत्रात मध्यरात्री अचानक छापेमारी करत सुमारे ३५०० किलो (३.५ टन) प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. तसेच संबंधित व्यक्तीकडून ५००० रुपये दंडाची वसुली करण्यात आली.ही कारवाई मा. आयुक्त श्री. मनोजकुमार सूर्यवंशी व मा. अति. आयुक्त श्री. संजय हेरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मा. उपआयुक्त श्रीमती अर्चना दिवे व सहा. आयुक्त श्रीमती नीता कोरे यांच्या आदेशानुसार पार पडली.कारवाईचे नेतृत्व वरिष्ठ आरोग्य निरीक्षक श्री. विकास पाटील यांनी केले. त्यांच्या समवेत कनिष्ठ आरोग्य निरीक्षक विनोद पाटील, गणेश घरत, केदार चव्हाण, अभिषेक कदम व मार्शल जितेश ठाकुर हे अधिकारी देखील उपस्थित होते.महानगरपालिकेच्या वतीने प्रतिबंधित प्लास्टिकच्या साठवणुकीवर व विक्रीवर सातत्याने कठोर पावले उचलली जात असून, अशा प्रकारच्या कारवाया भविष्यातही सुरू राहतील,असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## ‘निवडणुकीच्या दिशेने मोठा टप्पा – २९ प्रभागांचा आराखडा शासनाकडे सादर! वसई-विरार महापालिकेच्या ११ वर्षांपूर्वी होमलेल्या निवडणुकीसाठी नव्या बळावर वाटचाल सुरु – प्रारूप आराखडा मंजुरीसाठी तयारीत

वसई-विरार | प्रतिनिधी

पाच वर्षांपासून अडकलेल्या वसई-विरार महानगरपालिकेच्या स्थानिक निवडणूकीच्या प्रक्रियेला आता नवा प्रोत्साहन मिळाला आहे. महापालिकेने २९ प्रभागांची रूपरेषा आणि ११५ नगरसेवकांची संकल्पना तयार करून शासनाकडे पाठवली आहे. ही टप्प्याटप्प्याने घेतलेली पायरी निश्चितपणे निवडणुकीच्या मार्गाला मोकळे करू शकते.

सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकं पुन्हा घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार, नगरविकास विभागाने जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त व नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना मार्गदर्शक परिपत्रके जारी केली आहेत.

महानगरपालिकेची ‘क’ वर्गातील ओळख असल्यामुळे, प्रभागरचना आराखडा महापालिका आयुक्तांच्या

पान नं.२वर

# संपादकीय...!

## धन्य आहे निवडणूक आयोग, धन्य आहे लोकशाही!

राज्य निवडणूक आयुक्तांनी दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे संकेत दिले आहेत. परंतु गेली साडेतीन वर्षे मुंबईसह तब्बल २७ महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका — सगळीकडेच लोकांच्या हातात असलेली सत्ता हिरावून घेतली आहे. निवडणुका न घेता सरकारने आपापल्या माणसांना प्रशासक म्हणून बसवले आणि लोकशाहीची संपूर्ण चेष्टा केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कारणे शोधून निवडणुका टाळण्याचा खेळ केला. जुनी कारणे संपली की नवीन कारणे पुढे केली. मात्र सर्वोच्च न्यायालयाने निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करण्यास सांगितले आणि सरकारची ही टाळाटाळी तात्पुरती थांबली.

निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारे निर्णय हे आता उघडपणे घेतले जात आहेत. वीव्हीपॅट मशीन वापरणार नसल्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे. म्हणजेच, बटण दाबल्यानंतर आपण दिलेला मत खरोखर कुणाला गेले, हे मतदाराला पडताळता येणार नाही. ही शंका अधिक गडद करणारी गोष्ट म्हणजे — मतदार याद्यांमध्ये कोणताही बदल न करण्याचा निर्णय.

निवडणुका ईव्हीएमवर होतील, पण वीव्हीपॅट नसेल — हा विरोधाभास स्पष्ट आहे. जर ईव्हीएम आणि वीव्हीपॅट वापरल्याने थोडा वेळ जास्त लागतो, असे कारण दिले जात असेल, तर सरळ सरळ मतपत्रिकेवर (बॅलेट पेपर) परत जाणे हेच लोकशाहीसाठी योग्य पाऊल ठरले असते. वेळेच्या नावाखाली पारदर्शकता काढून टाकणे हे लोकशाहीच्या गळ्याला फास लावण्यासारखे आहे.

याहून मोठी चिंता म्हणजे — महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मध्यप्रदेशातून तब्बल २५,००० ईव्हीएम आणल्या जाणार आहेत. मध्यप्रदेश विधानसभा निवडणुकांमध्ये ईव्हीएम हेराफेरीच्या गंभीर आरोपांची चर्चा झाली होती. तेथील निकाल अनपेक्षितपणे भाजपाच्या बाजूने वळले, असा ठाम आरोप विरोधकांसह अनेकांनी केला. आता त्याच मशीन महाराष्ट्रात येत असल्याने संशयाची सुई आणखी तीक्ष्ण झाली आहे.

२०१९च्या विधानसभा निवडणुकीतही ईव्हीएम आणि मतदार याद्यांतील फेरफारची चर्चा होती. मतदान संपण्याच्या शेवटच्या दोन तासांत तब्बल साठ लाख मतदार वाढले आणि हे सारेच मत एकाच पक्षाच्या गळ्यात पडले, हा योगायोग म्हणावा की खेळ? मतदान केंद्रांवर कुठेही रांगा नसतानाही असे निकाल लागणे म्हणजे सरळसरळ संशयाचे आमंत्रणच!

दरम्यान, गेल्या तीन वर्षांत प्रशासकांच्या माध्यमातून महानगरपालिकांत झालेली लूट पाहिली तर — अहिल्यानगर महानगरपालिकेत कागदावर ३००-४०० कोटींच्या 'रस्त्या' बांधल्या गेल्या, पण शहरात पाऊल टाकले तर त्या दिसतच नाहीत. नगरीय विकास विभागातील भ्रष्टाचार, इतर पक्षांचे नेते विकत घेण्यासाठी खर्च केलेले पैसे, आणि आता त्याच पैशातून निवडणुका लढवण्याची तयारी — हे सगळे उघड आहे.

आज न्यायव्यवस्थेवर सुद्धा प्रश्नचिन्ह आहे. विविध न्यायासनांवर सत्ताधाऱ्यांचे प्रवक्तेच बसवले जात असल्याचा आरोप आहे. त्यामुळे कोणत्याही भ्रष्टाचार किंवा निवडणूक गैरव्यवहारावरील याचिका खोडून काढण्याचे काम सोपे होते.ही परिस्थिती लोकशाहीसाठी गंभीर धोका आहे. निवडणुका वेळेत, पारदर्शक आणि स्वच्छ पद्धतीने घेणे हा निवडणूक आयोगाचा मूलभूत धर्म आहे. मात्र आज तो धर्म राजकीय दबावाखाली तुडवला जातोय. निवडणूक आयोग लोकांचा, की सत्ताधाऱ्यांचा — हा प्रश्न आता जनतेपुढे उभा आहे.धन्य आहे आपली लोकशाही, आणि धन्य आहे आपली 'स्वतंत्र' निवडणूक प्रणाली!

## 'निवडणुकीच्या दिशेने मोठा टप्पा ....पान नं १

मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाच्या सूचना नुसार, १२६ सदस्यांपर्यंत प्रभागनिहाय सदस्यसंख्या वाढविण्याच्या आरक्षणानुसार रचना आखण्यात आली आहे.

यामुळे आता २८ प्रभागांत चार नगरसेवक; तर एक प्रभागात तीन नगरसेवक असा पूर्ण आराखडा शासकीय मंजुरीसाठी तयार होत आहे. शासन आणि आयोगाकडून अंतिम मान्यता २१ ऑगस्टपर्यंत मिळाली पाहिजे, म्हणजे लवकरच महापालिकेच्या निवडणुकीचे मार्गदर्शन सुरु होईल.

## आदिवासी आणि दुर्गम भागातील ....पान नं ३

ज्येष्ठ नागरिकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. इमारतीच्या बांधकामात पर्यावरणपूरक व ऊर्जा बचतीच्या संकल्पनांचा अवलंब करण्यात आला असल्याचे न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांनी सांगितले.ग्रामीण भागात न्यायालयीन प्रक्रिया सुलभ करणे ही काळाची गरज असून 'न्यायालयाच्या नव्या इमारतीमुळे केवळ प्रलंबित खटल्यांच्या निवारणाला गती मिळणार नाही, तर नागरिकांना आपल्या हक्कासाठी न्यायालयापर्यंत पोहोचणे सोपे होईल तसेच, न्यायव्यवस्थेतील पारदर्शकता, वेगवान निर्णयप्रक्रिया आणि सर्वसामान्यांचा विश्वास वृद्धिंगत करणे या उद्दिष्टांसाठी सर्व संबंधितांनी एकत्रितपणे कार्य करावे, असे आवाहनही न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांनी केले.या लोकार्पणामुळे जव्हार व आसपासच्या तालुक्यांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, न्यायालयीन प्रक्रिया अधिक कार्यक्षम आणि लोकाभिमुख होईल, असा विश्वास न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांनी व्यक्त केला.

जव्हार येथील दिवाणी व फौजदारी न्यायालय नूतन इमारतीच्या लोकार्पण प्रसंगी बोलताना ठाणे जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल यांनी सांगितले, की न्याय मिळविण्याचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. तो जलद, पारदर्शक व सुलभ पद्धतीने देणे ही न्यायव्यवस्थेची जबाबदारी आहे. हे नवीन न्यायालय भवन त्या दिशेचे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शासनाच्या प्रयत्नांचे कौतुक करताना सांगितले की, 'या न्यायालयामुळे जव्हार तालुका व परिसरातील हजारो नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचेल, तसेच न्यायावरचा विश्वास अधिक दृढ होईल.'

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त वसईत ....पान नं ४

बहुजन विकास संघटना ॲड. आसिफ शेख, युवा अध्यक्ष मंदा वाघ, उपाध्यक्षा अनिल वाघेला, गुजरात संपर्क प्रमुख सलमा सय्यद, वसई तालुका महिला उपाध्यक्षा मीना तडवी, वसई-विरार शहर महिला सचिव तसेच लता वाघ, अर्चना भगत, गीता पानपाटील, दीपक माने, मंगेश भगत, सुरेश ठोंबरे, सचिन गांगडे आदी अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि माणुसकी या मूलभूत संविधानिक मूल्यांची जाणीव नागरिकांमध्ये जागवली गेली. अण्णाभाऊ साठे यांचा साहित्य, संघर्ष आणि समाज परिवर्तन यांचा वारसा युवकांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार या वेळी नव्याने करण्यात आला.

## वसई-विरार महापालिकेच्या ....पान नं १

या प्रकरणात एकूण १२ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले. यामध्ये पवार यांच्या नातेवाईकांची घरे, काही बांधकाम व्यावसायिकांचे निवासस्थान आणि कंत्राटदारांच्या कार्यालयांचाही समावेश होता.पूर्वीच्या छाप्यात कोट्यवधींचा माल जप्त मे महिन्यात ईडीने मुंबई आणि हैदराबाद येथील १३ ठिकाणी छापे टाकून९.४ कोटींची रोख रक्कम, २३.२५ कोटींचे हिरे-जडित दागिने आणि सोने तसेच, अनेक महत्त्वाची कागदपत्रेजप्त केली होती.तपासात हे बेकायदेशीर बांधकाम रूरण मधील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या थेट संगनमताने झाल्याचे निष्पन्न झाले होते. मुख्य आरोपी म्हणून सिताराम गुप्ता आणि अरुण गुप्ता यांची नावे समोर आली. तसेच तत्कालीन उपनगररचना संचालक वाय. एस. रेड्डी यांच्या घरी टाकलेल्या छाप्यात ८.६ कोटी रोख आणि कोट्यवधींचा दागिन्यांचा साठा मिळाला होता.आगामी कारवाईवर सर्वांचे लक्षईडीच्या या ताज्या छापेमारीनंतर या प्रकरणातील आणखी नवे धागेदोरे समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, काही मोठी नावे तपासाच्या रडारवर आहेत.

वसई-विरार महानगरपालिकेतील बेकायदेशीर बांधकाम घोटाळ्याचा हा सर्वात मोठा टप्पा ठरण्याची शक्यता व्यक्त होत असून, येत्या काही दिवसांत आणखी अटक आणि मालमत्ता जप्तीच्या कारवायाही होऊ शकतात.







# आदिवासी आणि दुर्गम भागातील न्यायालयीन प्रक्रियेच्या वेगवान पर्वाची सुरुवात

## ....मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी

## जव्हार येथील दिवाणी व फौजदारी न्यायालय नूतन इमारतीचा लोकार्पण सोहळा संपन्न

पालघर दिनांक १० ऑगस्ट : जिल्ह्यातील आदिवासी बहुल जव्हार तालुक्यातील नागरिकांना आता न्याय मिळविण्यासाठी लांब प्रवास करावा लागणार नाही. अत्याधुनिक व सुसज्ज अशा नव्या न्यायालय भवनाचे लोकार्पण करण्यात आले असून आदिवासी आणि दुर्गम भागातील न्यायालयीन प्रक्रियेच्या वेगवान पर्वाची सुरुवात झाली असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी केले. आज विधी क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या लोकार्पण सोहळयास मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे, न्यायमूर्ती सेठना, ठाणे जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल, आ. हरिश्चंद्र भोये, पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, राजे महेंद्रसिंग मुकणे ,जव्हार तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष प्रसन्न भोईर, जव्हारच्या दिवाणी न्यायाधीश माया मथुरे आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.तसेच न्यायालयीन अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीस अधिकारी, वकील संघाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती लाभली.पूर्वी जव्हार व आसपासच्या गावांतील नागरिकांना न्यायालयीन खटल्यांसाठी तलासरी, पालघर किंवा नाशिकपर्यंत प्रवास करावा लागत होता. यात वेळ, पैसा व श्रमाचा मोठा खर्च होत असे. आता हे न्यायालय स्थानिक पातळीवरच कार्यरत असल्यामुळे नागरिकांना जवळच्या अंतरावर न्याय मिळू



शकेल. त्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील न्यायालयीन प्रक्रिया अधिक वेगवान व सोपी होणार असल्याचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी सांगितले.नवीन न्यायालयाच्या माध्यमातून ई-कोर्ट सेवा, ऑनलाईन खटला नोंदणी, तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी यांसारख्या सुविधा सुरू करण्याचीही योजना आहे.

यामुळे नागरिकांना डिजिटल न्यायव्यवस्थेचा लाभ घेता येणार असल्याचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी सांगितलेया लोकार्पणामुळे जव्हार व आसपासच्या ग्रामीण भागात न्यायालयीन प्रक्रियेच्या सोयी-सुविधांचा दर्जा मोठ्या प्रमाणात उंचावला असून, आदिवासी भागात न्यायव्यवस्थेच्या नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे समाधान न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

ग्रामीण व आदिवासी भागातील न्यायालयीन प्रक्रिया अधिक सुलभ होणार

....मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे

ग्रामीण व आदिवासी बहुल भागात न्यायसेवा अधिक सुलभ व प्रभावी करण्याच्या उद्देशाने जव्हार येथे नव्याने उभारलेल्या भव्य व सुसज्ज न्यायालय भवनाचे लोकार्पण करण्यात आले असल्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील न्यायालयीन प्रक्रिया अधिक सुलभ होणार असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांनी केले.नवीन न्यायालय भवनात प्रशस्त न्यायालयीन कक्ष, वकील कक्ष, साक्षीदारांसाठी स्वतंत्र प्रतीक्षागृह, नोंदणी व अभिलेख व्यवस्थेसाठी अत्याधुनिक कार्यालये, तसेच दिव्यांग व

पान नं.२वर




## भूमाफियाचा डोंगरावर डाका –

### महापालिका व वन विभागाच्या बेपर्वाईला जनता सवाल करते!

### वसई-विरारच्या डोंगरांवर अवैध खोदकाम; प्रशासनाचे मौन संशयास्पद



वसई-विरार परिसरात काही डोंगर सपाट होत आहेत, पण यामागे विकास नव्हे तर अवैध उत्खननाचा काळा कारभार लपलेला आहे, असा गंभीर आरोप नागरिकांकडून होत आहे. स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, या प्रकरणात भूमाफिया आणि महापालिका तसेच वन विभागातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांमध्ये संगनमत असल्याचा संशय बळावला आहे.

अनेक वर्षांपासून डोंगर फोडून माती, दगड आणि इतर संसाधनांची चोरी सुरू असून, यामुळे परिसराचा पर्यावरणीय समतोल बिघडत आहे. धोकादायक पातळीपर्यंत झालेल्या या विध्वंसामुळे पावसाळ्यात भूस्खलन, पाणीटंचाई आणि मातीची धूप यांसारख्या आपत्ती ओढवण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

स्थानिकांचे म्हणणे आहे की, इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या या अवैध कारभाराकडे महापालिका व वन विभागाचे दुर्लक्ष होणे म्हणजे केवळ ‘डोळेझाक’ नसून, ‘सांगून-सांगून कानावर हात ठेवणे’ आहे. काहींचा आरोप आहे की, या सगळ्याला राजकीय पाठबळ असून, त्यातून लाखो रुपयांचा काळा पैसा मिळत आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका, वन विभाग आणि संबंधित प्राधिकरणांनी या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा, डोंगरांसोबतच जनतेच्या विश्वासाचाही विध्वंस होईल, असा इशारा स्थानिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त वसईत सामाजिक न्याय जनजागृती — संविधान मूल्यांना समर्पित भव्य कार्यक्रम



वसई (प्रतिनिधी) —'शोषित-पीडितांच्या व्यथा मांडणारा कवी म्हणजे अण्णाभाऊ साठे!' — अशा शब्दांत वसईत त्यांच्या जयंती निमित्त एक प्रेरणादायी सामाजिक न्याय जनजागृती कार्यक्रम पार पडला. भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव आणि महापुरुषांच्या क्रांतीकारी विचारांचा जागर घडवणाऱ्या या उपक्रमाचे आयोजन प्रजा सुराज्य पक्ष व राष्ट्रीय बहुजन विकास संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी, कोर्ट नाका, वसई (पश्चिम) येथे करण्यात आले.या आधीच २६ जून रोजी छत्रपती शाहू महाराज जन्मोत्सव देखील सामाजिक समतेचा उद्घोष करत साजरा करण्यात आला होता. ही परंपरा पुढे नेत, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना समर्पित या कार्यक्रमात सामाजिक समता, आर्थिक न्याय आणि बंधुता यांचा प्रभावी आवाज ऐकायला मिळाला.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून करण्यात आली. उपस्थित प्रमुख मान्यवरांमध्ये प्रजा सुराज्य पक्षाच्या महिला जिल्हा अध्यक्षा रमा जाधव, अ‍ॅड. किरण म्हात्रे, आणि अध्यक्षस्थानी पक्षाचे सहसचिव राहुल हुडानशिव होते.कार्यक्रमाचे मार्गदर्शन करताना अण्णासाहेब तिगोटे यांनी सशक्त शब्दांत सांगितले, 'बेकी नको, एकी हवी! — हे केवळ घोषवाक्य नसून, सामाजिक परिवर्तनाचा पाया आहे. शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांचा वारसा जपणाऱ्या सर्व संघटनांनी बुरसटलेल्या प्रवृत्तींचा प्रतिकार करत एकत्र यावे, ही काळाची गरज आहे.'कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या मा. चंद्रकला भोजने (क्रिमिनल जस्टीस विभाग) यांनी संविधानिक अधिकार, सामाजिक न्याय आणि दलित समाजाच्या सक्षमीकरणावर प्रभावी भाष्य केले.उपस्थित मान्यवरांची यादी:विनायक खर्डे, अध्यक्ष – शंभूराजे मिशन जितेंद्र शिरसाट, कार्याध्यक्ष – राष्ट्रीय

पान नं.२वर

# प्रलंबित वनहक्क दावे निकाली; बांबू लागवडीसाठी तात्काळ उपाय योजना-विवेक पंडित



वसई : वसई तालुक्यातील प्रलंबित वनहक्क दावे, अमृत आहार २.० योजना, आदिवासी व महिलांच्या विकासासाठी बांबू लागवड प्रकल्प तातडीने राबविण्याचे आदेश आदिवासी विकास आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी दिले.वसई विरार महानगरपालिकेत झालेल्या बैठकीत विविध विभाग प्रमुख, महापालिका अधिकारी व आदिवासी प्रतिनिधी सहभागी झाले. पंडित यांनी सांगितले की बांबू लागवडही रोजगारनिर्मितीबरोबरच पर्यावरणपूरक उपक्रम असून, आदिवासी महिलांच्या बचतगटांना यात प्राधान्य द्यावे.बैठकीत अमृत आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी, बांबू उत्पादने तयार करून स्थानिक उद्योगांना चालना, तसेच प्रलंबित दावे लवकर निकाली काढण्यावर भर देण्यात आला. पंडित यांनी इशारा दिला की, ठरवलेल्या वेळेत काम पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल.

[redacted]

# डहाणू येथे रानभाजी व पारंपरिक खाद्य महोत्सव

## स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ व रोजगाराला चालना मिळणार



पालघर, दि. १० ऑगस्ट : आदिवासी विकास विभागाच्या निर्देशानुसार, राज्यातील आदिवासी भागांमध्ये रानभाजी व पारंपरिक खाद्य महोत्सवांचे आयोजन सुरू करण्यात आले असून, या उपक्रमाचा उद्देश म्हणजे आदिवासी भागातील रानभाज्या, रानफळे, वनौषधी व अन्नधान्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा आहे.या उपक्रमाअंतर्गत, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू यांच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक महिलांच्या सहभागातून रानभाजी व पारंपरिक खाद्य महोत्सव डहाणू तालुक्यातील पारनाका पळसपाडा येथे उत्साहात पार पडला. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) यांच्या सहकार्याने आयोजित या महोत्सवात डहाणू, तलासरी, पालघर व वसई तालुक्यातील सुमारे ३४ बचत गटांनी सहभाग घेतला. प्रत्येक बचत गटाने विक्रीसाठी रानभाज्या व हंगामी भाजीपाला मांडला होता. यामध्ये माठ, अंबाडी, उडदाची डाळ, खुरसानी, अळू, शेवगा, कुर्डू, डाळीबाजी, वास्ता, भेंडी, कंटोली, पेंढरे, अभयच्या शेंगा, दुधी अशा अनेक भाज्यांचा समावेश होता. शहरी भागातील नागरिकांना रानभाज्यांची ओळख करून देत त्यांच्या पौष्टिकतेबाबत महिलांनी माहिती दिली. तसेच या भाज्यांपासून बनवलेल्या पदार्थी ठेवण्यात आले होते, ज्यांचा आस्वाद घेऊन उपस्थितांनी चवीची दाद दिली.महोत्सवामुळे नैसर्गिकरीत्या जंगलात उपलब्ध असलेल्या रानभाज्या, कंदमुळे, फळे व फुलभाज्या डहाणूकरांना एका ठिकाणी पाहण्याची व खरेदी करण्याची संधी मिळाली.कार्यक्रमाचे उद्घाटन सर्व महिला बचत गटांच्या अध्यक्षांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून झाले. प्रकल्प अधिकारी व सहाय्यक जिल्हाधिकारी विशाल खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमास सहाय्यक प्रकल्प अधिकारी बन्सीलाल पाटील, उमेदचे समन्वय अधिकारी प्रभुदास गावित, सुनील वाघ, आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकल्प कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. हा उपक्रम स्थानिकांना उत्पन्नाचे साधन व पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे जतन करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे.




## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ में. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in